# द्राक्षमळ्यातील काम करणाऱ्यांचा दृष्टांत

स्वर्गाचे राज्य कोणा एका घरधन्या सारखे आहे. जो आपल्या द्राक्षमळ्यात मोलाने  कामकरी लावावयास मोठ्या पाहाटेस बाहेर गेला; आणि त्याने कामकऱ्यांना रोजचा रुपया ठरवून त्यांना आपल्या द्राक्षमळ्यात पाठवले.

नंतर तो तिसऱ्या तासाच्या सुमारास  बाहेर गेला आणि त्याने बाजारपेठात कित्येक लोकांना रिकामे उभे राहिलेले पाहिले. तो त्यांना म्हणाला, तुम्हीही द्राक्षमळ्यात जा, जे योग्य ते मी तुम्हास देईल; आणि ते गेले. पुनः सहाव्या व नवव्या तासाच्या सुमारास त्याने बाहेर जाऊन तसेच केले.

नंतर अकराव्या तासाच्या सुमारास तो बाहेर गेला तेव्हा आणखी कित्येक उभे राहिलेले त्याला दिसले. त्यांना पण त्याने म्हटले, तुम्ही सगळा दिवस येथे रिकामी का उभे राहिला आहात? ते त्याला म्हणाले, आम्हास कोणी कामावर घेतले नाही म्हणून. त्याने त्यांना म्हटले, तुम्हीही द्राक्षमळ्यात जा.

नंतर संध्याकाळ झाल्यावर द्राक्षमळ्याचा मालिक आपल्या कारभाऱ्याला म्हणाला , कमकऱ्यांना बोलवा आणि शेवटल्यापासून आरंभ करून पहिल्या पर्यंत त्यांना मजुरी दे. तेव्हा ते अकराव्या तासाच्या सुमारास काम करण्यास होते ते आल्यावर त्यांना पण रुपया रुपया मिळाला. आणि जे पहिले आले त्याना आपल्याला अधिक

मिळेल असे त्यांना वाटले. तरी त्यांनाहि रुपयाच मिळाला. रुपया त्यांनी घेतल्यावर घरधन्याविरुद्ध कुरकुर करीत म्हटले, ह्या शेवटल्यांनी एकच तास काम केले, आम्ही दिवसभर उन्हातान्हात कष्ट केले आणि आम्हास व त्यास आपण सारखे लेखिले.

तेव्हा मालिकने त्यातील एकाला उत्तर दिले, गड्या, मी तुझा अन्याय करीत नाही; तू माझ्याबरोबर रुपयाचा ठराव केला नाही काय? त्याप्रमाणे तू आपला रुपया घेऊन चालायला लाग; जसे तुला तसे ह्या शेवटल्यालाहि द्यावे अशी माझी इच्छा आहे; जे माझे आहे त्याचे मी आपल्या मर्जीप्रमाणे करावयास योग्य नाही काय? मी चांगला आहे हे तुझ्या डोळ्यांनी वाईट दिसते काय?

ह्याप्रमाणे शेवटले ते पहिले आणि पहिले ते शेवटले होतील.

निष्कर्ष:- देवाने दिलेला आशीर्वाद, देवाने दिलेले वरदान, ह्याविषयी प्रत्येक परिस्थितीत कुरकुर न करता विश्वासा मध्ये निरंतर बनून राहणे गरजेचे आहे.

**मतय २०:१-१६**